“ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षण प्रसार”

- शिक्षण महर्षी डॉ. बापूजी साळुंखे

**Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha, Kolhapur**

# Dattajirao Kadam Arts, Science and Commerce College, Ichalkaranji

# LIBRARY

## Newspaper Clippings

## 2022-23 – PART 2.2

तरुण भारत | मंगळवार, १ नोव्हेंबर २०२२

# इचलकरंजी महापालिकेतर्फे एकता दौड उत्साहात

**इचलकरंजी :** येथे महापालिकेतर्फे सरदार वल्लभभाई पटेल जयंतीनिमित्त एकता दौड पार पडली. अटल बिहारी वाजपेयी चौक ते शिवतीर्थ, महात्मा गांधी पुतळा ते शिवतीर्थ आणि डीकेएएससी महाविद्यालय ते शिवतीर्थ अशा तीन ठिकाणांहून एकता दौड काढण्यात आली. शिवतीर्थ येथे एकत्रित आल्यानंतर मान्यवरांनी राष्ट्रीय एकता शपथ घेतली. यामध्ये प्रशासक सुधाकर देशमुख, सहाय्यक आयुक्त केतन गुजर, नगरसचिव विजय राजापुरे, आरोग्य अधिकारी डॉ. सुनिलदत्त संगेवार, जल अभियंता सुभाष देशपांडे, नगररचनाकार रणजित कोरे, माजी नगरसेवक संतोष शेळके, लेखापरीक्षक नितिन सरगर, क्रीडा अधिकारी शंकर पोवार, एएससी. महाविद्यालयाचे प्रा. मोहन विरकर, जनसंपर्क अधिकारी नितिन बनगे, सहा. क्रीडा अधिकारी संजय कांबळे, संजय शेटे, सचिन खोंद्रे, आकाश माने, महेश शेळके, शिवम स्वामी, तात्यासो कुंभोजे, अर्जुन मगदुम, विभाग प्रमुख, अधिकारी, कर्मचारी यांच्यासह जयहिंद मंडळ, जिजाऊ स्पोर्टस, डायनेमिक स्पोर्टस, रिंगण फिटनेस, आयएम फिट क्लब, आर्चरी क्लब, महाराष्ट्र स्पोर्टस, सोहम योग मंडळ, डीकेएएससी महाविद्यालयाचे एनसीसी विद्यार्थी सहभागी झाले होते.

CS Scanned with CamScanner

सकाळ

बुधवार,
२ नोव्हेंबर २०२२

# 'डीकेएएससी'मध्ये अभिवादन कार्यक्रम

**इचलकरंजी :** डीकेएएससी महाविद्यालयात माजी पंतप्रधान (कै.) श्रीमती इंदिरा गांधी यांचा स्मृतिदिन व सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती साजरी करण्यात आली. प्रा. अरुण कटकोळे यांनी प्रास्ताविक केले. प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांनी प्रतिमापूजन केले. राष्ट्रीय एकता दिवस शपथचे वाचन अर्पिता गड्डेने केले. मेजर मोहन विरकर, प्रा. डॉ. डी. सी. कांबळे, डॉ. डी. जी. घोडके, डॉ. पी. के. वाघमारे, डॉ. एस. जे. वेल्हाळ यांसह प्राध्यापक आणि एनएसएस व एनसीसीचे स्वयंसेवक उपस्थित होते.

Scanned with CamScanner

दक्षिण महाराष्ट्र
केसरी
३ नोव्हेंबर २०२२/५



इचलकरंजी : अलिशा नाईकवाडे हिचा सत्कार करताना प्राचार्य डॉ. अनिल पाटील आदी.

# डी.के.ए.एस.सी कॉलेजला बॉक्सिंग स्पर्धेत सुवर्णपदक

केसरी वृत्तसेवा

**इचलकरंजी :** शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथे संपन्न झालेल्या आंतर विभागीय बॉक्सिंग स्पर्धेत श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे डी. के. ए. एस. सी महाविद्यालयाची खेळाडू अलिशा नाईकवाडे (बी.ए.: ३. भाग. ३) हीने ६३ ते ६६ किलो वजनी गटात उत्कृष्ठ कामगीरी करत सुवर्णपदक पटकावले. व हरीयाणा रोहतक (हरीयाणा) येथे होणाऱ्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ बॉन्सिंग स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठ संघात निवड झाली. या स्पर्धेसाठी सांगली, सातारा व कोल्हापूर शहरातील विविध महाविद्यालयानी सहभाग नोंदवला होता.अलिशाचा प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तिला प्रा. मेजर एम. जे. विरकर, प्रा. मुझकर लगीवाले व प्रा. प्रशांत कांबळे यांचे मार्गदर्शन लाभले.

CS Scanned with CamScanner

सकाळ
शुक्रवार,
४ नोव्हेंबर २०२२




इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयात माध्यमांतर अभ्यास उपक्रम कार्यक्रमात बोलताना लेखक संतोष फिरींगे. व्यासपीठावर अन्य मान्यवर.

# माध्यमांतर अभ्यास उपक्रम

इचलकरंजी, ता. ३ : डीकेएएससी महाविद्यालयात माध्यमांतर अभ्यास उपक्रम झाला. डीकेएएससी कॉलेज आणि श्रीमती आ. रा. पाटील कन्या महाविद्यालय यांच्या मराठी विभागामध्ये झालेल्या अनुबंध करारांतर्गत या माध्यमांतर अभ्यास उपक्रम घेण्यात आला.

शिवाजी विद्यापीठाच्या मराठी विषयाच्या अभ्यासक्रमातील साहित्याच्या चित्रपटातील माध्यमांतर या अनुषंगाने संतोष फिरींगे यांच्या लघुकथेचे 'झेल्या' चित्रपटात झालेले माध्यमांतर प्रत्यक्ष लेखकाच्या व्याख्यानातून विद्यार्थ्यांना अनुभवायला मिळाले. प्रमुख पाहुणे श्री. फिरींगे यांनी विद्यार्थ्यांच्या महत्त्वाकांक्षेस ग्रामीण जीवनातील समजुती, दारिद्र्य अंधश्रद्धांमुळे कशी खीळ बसते याचे विवेचन करणारा 'झेल्या' चित्रपट विद्यार्थ्यांना दाखवला. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. अनिल पाटील होते. नवीन शैक्षणिक धोरण व नॅक पुनर्मूल्यांकनाच्या दृष्टीने अनुभवाधिष्ठित, कौशल्यपूरक ठरणारा आणि अनुबंध कराराला अपेक्षित असा नावीन्यपूर्ण उपक्रम महाविद्यालयात आयोजित केल्याबद्दल प्राचार्य डॉ. पाटील यांनी समाधान व्यक्त केले. यावेळी उपप्राचार्य डॉ. डी. सी. कांबळे, प्रा. डी. ए. यादव, डॉ. सुनीता वेल्हाळ, ग्रंथपाल विजय यादव, डॉ. अंजली उबाळे, डॉ. प्रियांका कुंभार उपस्थित होते. कार्यक्रमाचे संयोजन मराठी विभाग प्रमुख प्रा. संजय सुतार आणि प्रा. डॉ. सुभाष जाधव यांनी केले. प्रास्ताविक डॉ. ज्ञानेश्वर कांबळे यांनी केले. आभार प्रा. प्रतिभा पैलवान यांनी मानले. सूत्रसंचालन प्रा. भारती कोळेकर यांनी केले.

CS Scanned with CamScanner

तरुण भारत
शुक्रवार, ४ नोव्हेंबर २०२२

15030 48 Days

# डीकेएएससीमध्ये माध्यमांतर अभ्यास उपक्रमास प्रतिसाद

**इचलकरंजी :** येथील दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स कॉलेज आणि श्रीमती आ. रा. पाटील कन्या महाविद्यालय यांच्या मराठी विभागांमध्ये झालेल्या अनुबंध करारांतर्गत माध्यमांतर अभ्यास उपक्रम झाला. शिवाजी विद्यापीठाच्या मराठी विषयाच्या अभ्यासक्रमातील साहित्याचे चित्रपटातील माध्यमांतर या अनुषंगाने संतोष फिरींगे यांच्या लघुकथेचे झेल्या चित्रपटात झालेले माध्यमांतर प्रत्यक्ष लेखकाच्या व्याख्यानातून विद्यार्थ्यांना अनुभवायला मिळाले. संतोष फिरींगे यांनी एका शालेय विद्यार्थ्याच्या महत्त्वाकांक्षेस ग्रामीण जीवनातील समजुती, दारिद्र्य अंधश्रद्धांमुळे कशी खीळ बसते याचे विवेचन करणारा झेल्या चित्रपट विद्यार्थ्यांना दाखविला. प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांनी नवीन शिक्षण धोरण व नॅक पुनर्मूल्यांकनाच्या दृष्टीने अनुभवाधिष्ठित, कौशल्यपूरक ठरणारा आणि अनुबंध कराराला अपेक्षित असा नावीन्यपूर्ण उपक्रम महाविद्यालयात होत आहेत, असे सांगितले. प्रास्ताविक डॉ. ज्ञानेश्वर कांबळे यांनी केले. आभार प्रा. प्रतिभा पैलवान यांनी मानले. सूत्रसंचालन प्रा. भारती कोळेकर यांनी केले. यावेळी डॉ. डी. सी. कांबळे, प्रा. डी. ए. यादव, डॉ. सुनीता वेल्हाळ, ग्रंथपाल विजय यादव, डॉ. अंजली उबाळे, डॉ. प्रियांका कुंभार, विद्यार्थी, विद्यार्थिनी उपस्थित होते. संयोजन प्रा. संजय सुतार, प्रा. डॉ. सुभाष जाधव यांनी केले.

CS Scanned with CamScanner

# डीकेएएससीमध्ये माध्यमांतर अभ्यास उपक्रम

**इचलकरंजी/महान कार्य वृत्तसेवा**

येथील दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स कॉलेज आणि श्रीमती आ.रा. पाटील कन्या महाविद्यालय यांच्या मराठी विभागांमध्ये झालेल्या अनुबंध करारांतर्गत माध्यमांतर अभ्यास उपक्रम संपन्न झाला.

शिवाजी विद्यापीठाच्या मराठी विषयाच्या अभ्यासक्रमातील साहित्याचे चित्रपटातील माध्यमांतर या अनुषंगाने संतोष फिरींगे यांच्या लघुकथेचे ' झेल्या ' चित्रपटात झालेले माध्यमांतर प्रत्यक्ष लेखकाच्या व्याख्यानातून विद्यार्थ्यांना अनुभवायला मिळाले.

प्रतिमापूजन दीपप्रज्वलनाने प्रारंभ झालेल्या या समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून संतोष फिरींगे यांनी एका शालेय विद्यार्थ्याच्या महत्त्वाकांक्षेस ग्रामीण जीवनातील समजुती,दारिद्र्य अंधश्रद्धांमुळे कशी खीळ बसते याचे विवेचन करणारा ' झेल्या ' चित्रपट विद्यार्थ्यांना दाखविला. सदर समारंभाच्या अध्यक्षस्थानावरून बोलताना प्राचार्य डॉ. अनिल



पाटील यांनी नवीन शिक्षण धोरण व नॅक पुनर्मूल्यांकनाच्या दृष्टीने अनुभवाधिष्ठित,कौशल्यपूरक ठरणारा आणि अनुबंध कराराला अपेक्षित असा नावीन्यपूर्ण उपक्रम महाविद्यालयात संपन्न होत असल्याबद्दल समाधान व्यक्त केले.

याप्रसंगी सकाळ सत्राचे प्रमुख डॉ. डी.सी. कांबळे व दुपार सत्राचे प्रमुख प्रा.डी.ए.यादव ,डॉ. सुनीता वेल्हाळ तसेच महाविद्यालयाचे ग्रंथपाल विजय यादव आणि डॉ.अंजली उबाळे ,डॉ.प्रियांका कुंभार यांची उपस्थिती लाभली.कार्यक्रमाचे संयोजन मराठी विभाग प्रमुख प्रा. संजय सुतार आणि प्रा. डॉ.सुभाष जाधव यांनी केले.समारंभाचे प्रास्ताविक डॉ. ज्ञानेश्वर कांबळे यांनी केले. आभार प्रा. प्रतिभा पैलवान यांनी मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. भारती कोळेकर यांनी केले. कार्यक्रमास डी. के.ए.एस.सी. व कन्या महाविद्यालयातील विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होते.

दक्षिण महाराष्ट्र
केसरी
७ नोव्हेंबर २०२२/५

# डी.के.ए.एस.सी.मध्ये माध्यमांतर अभ्यास उपक्रम

केसरी वृत्तसेवा

**इचलकरंजी :** येथील दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स कॉलेज आणि श्रीमती आ. रा. पाटील कन्या महाविद्यालय यांच्या मराठी विभागांमध्ये झालेल्या अनुबंध करारांतर्गत माध्यमांतर अभ्यास उपक्रम नुकताच संपन्न झाला. शिवाजी विद्यापीठाच्या मराठी विषयाच्या अभ्यासक्रमातील साहित्याचे चित्रपटातील माध्यमांतर या अनुषंगाने संतोष फिरींगे यांच्या लघुकथेचे 'झेल्या' चित्रपटात झालेले माध्यमांतर प्रत्यक्ष लेखकाच्या व्याख्यानातून विद्यार्थ्यांना अनुभवायला मिळाले. अध्यक्षस्थानावरून बोलताना प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांनी नवीन शिक्षण धोरण व नॅक पुनर्मूल्यांकनाच्यादृष्टीने अनुभवाधिष्ठित, कौशल्यपूरक ठरणारा आणि अनुबंध कराराला अपेक्षित असा नावीन्यपूर्ण उपक्रम महाविद्यालयात संपन्न होत असल्याबद्दल समाधान व्यक्त केले. याप्रसंगी डॉ. डी.सी. कांबळे, प्रा. डी. ए. यादव, डॉ. सुनीता वेल्हाळ, विजय याद, डॉ.अंजली उबाळे, डॉ.प्रियांका कुंभार, प्रा. संजय सुतार, डॉ.सुभाष जाधव आदी उपस्थित होते. प्रास्ताविक डॉ. ज्ञानेश्वर कांबळे, आभार प्रा. प्रतिभा पैलवान यांनी मानले. सूत्रसंचालन प्रा. भारती कोळेकर यांनी केले.

Scanned with CamScanner

सकाळ

बुधवार,
९ नोव्हेंबर २०२२

## रोहित शिंगे नेट उत्तीर्ण



रोहित शिंगे

**इचलकरंजी :** नुकत्याच ऑक्टोबरमध्ये झालेल्या यूजीसी नेट या राष्ट्रीय पात्रता परीक्षेमध्ये रोहित शिंगे उत्तीर्ण झाले. ते मराठी विषयातून उत्तीर्ण झाले आहेत. महाविद्यालयीन काळात अनेक वक्तृत्व स्पर्धा यशस्वीपणे जिंकत अभ्यासाबरोबर विविध साहित्यिक कार्यक्रमांमध्ये ते कार्यरत असतात. मराठीतून नेट उत्तीर्ण झाल्याबद्दल त्यांचे कौतुक होत आहे. यशासाठी त्यांना डीकेएएससी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल पाटील, मराठी विभागप्रमुख डॉ. एकनाथ आळवेकर, डॉ. संजय सुतार, डॉ. सुभाष जाधव, मेजर एम. जे. वीरकर यांचे मार्गदर्शन लाभले.

Scanned with CamScanner

पुढारी, सोमवार, १४ नोव्हेंबर २०२२

## दत्ताजीराव कदम महाविद्यालयात कार्यशाळा

**इचलकरंजी :** येथील दत्ताजीराव कदम आर्टस्, सायन्स अँड कॉमर्स महाविद्यालयात प्राणीशास्त्र विभागाच्या वतीने 'मोती उत्पादन शेती' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. प्राचार्य डॉ. अनिल पाटील व दिलीप कांबळे यांच्या हस्ते उद्घाटन झाले. डॉ. पी. के. वाघमारे यांनी प्रास्ताविक केले. कांबळे यांनी मोती शेती संकल्पना शोध, इतिहास, मोती शेती काळाची गरज, मोती शेती या लघू उद्योगाचे महत्त्व, विविध देशांत चाललेली मोती शेती या विषयी माहिती दिली. भारतात ही शेती खूपच अल्प प्रमाणात केली जाते. त्यासाठी देशात हा उद्योग वाढविल्यास त्यामुळे होणारे फायदे, मोतीचे प्रकार, त्याचे उत्पादन, प्रत्यक्ष उत्पादन त्यांची विक्री, आयात, निर्यात याबाबत मार्गदर्शन केले. डॉ. रेश्मा सनदी यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. डॉ. निलोफर शेख यांनी आभार मानले. यावेळी डी. ए. यादव, डॉ. एस. टी. इंगळे, डॉ. ए. के. जांभळे, सुप्रिया पाटील आदींसह विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

CS Scanned with CamScanner

सकाळ
सोमवार,
१४ नोव्हेंबर २०२२




इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयात मोती उत्पादन शेती, या एकदिवसीय कार्यशाळेत बोलताना दिलीप कांबळे.

# 'डीकेएएससी'मध्ये मोती उत्पादन कार्यशाळा

इचलकरंजी, ता. १३ : विविध देशांत मोतीशेती करण्याकडे कल वाढत आहेत; परंतु भारतात ही शेती खूपच अल्प प्रमाणात केली जाते. भारत देशात हा उद्योग वाढवल्यास शेतकऱ्यांची व देशाची आर्थिक उन्नती वाढण्यास मोठी मदत होईल, असे प्रतिपादन दिलीप कांबळे यांनी केले.

दत्ताजीराव कदम आर्टस्, सायन्स अँण्ड कॉमर्स महाविद्यालयात मोती उत्पादन शेती, या एकदिवसीय कार्यशाळेच ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते.

शिवाजी विद्यापीठाच्या अग्रणी महाविद्यालय योजनेच्या कॉलेज क्लस्टर विजयसिंह यादव कला व विज्ञान महाविद्यालय पेठवडगावअंतर्गत प्राणीशास्त्र विभागातर्फे मोती उत्पादन शेती, या विषयावर एकदिवसीय कार्यशाळा झाली. याचे उद्घाटन प्राचार्य डॉ. अनिल पाटील व प्रमुख अतिथी श्री. कांबळे यांच्या हस्ते झाले. प्रास्ताविक व प्रमुख पाहुण्यांची ओळख प्राणीशास्त्र विभागप्रमुख डॉ. पी. के. वाघमारे यांनी करून दिली. प्रमुख पाहुणे श्री. कांबळे यांचा सर्वसामान्य शेतकरी ते मोती उत्पादक उद्योजक असा यशस्वी प्रवास पूर्ण केला आहे. मोती शेती संकल्पना शोध, इतिहास, मोतीशेती काळाची गरज, मोतीशेती या लघुउद्योगाचे महत्त्व, विविध देशांत चाललेली मोतीशेती, भारतात हा उद्योग वाढवल्यास होणारे फायदे, मोतीचे प्रकार, त्याचे उत्पादन, त्याची गुणवत्ता तपासणी व त्यांचे मानांकन, नैसर्गिक व कृत्रिमरीत्या या दोन्ही शेती करावयाची प्रक्रिया, मृदुकाय प्राणी शिंपल्यांची घ्यावयाची काळजी, प्रत्यक्ष उत्पादन त्यांची विक्री, आयात निर्यात, मोतीशेतीसाठी शासनाच्या योजना व आर्थिक सवलती अशा विषयांवर त्यांनी चर्चा करून मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन डॉ. रेश्मा सनदी यांनी केले. प्रा. डॉ. निलोफर शेख यांनी आभार मानले. कार्यशाळेस अग्रणी महाविद्यालय योजनेअंतर्गत येणाऱ्या महाविद्यालयांचे समन्वयक व विद्यार्थी उपस्थित होते. उपप्राचार्य डी. ए. यादव, डॉ. एस. टी. इंगळे, सुप्रिया पाटील उपस्थित होते.

CS Scanned with CamScanner

सकाळ

सोमवार,
१४ नोव्हेंबर २०२२



इचलकरंजी : जिल्हास्तरीय महाविद्यालयीन प्रश्नमंजूषा स्पर्धेत डीकेएएससी महाविद्यालयाने तृतीय क्रमांक प्राप्त केला.

# डीकेएएससी महाविद्यालयाचे यश

**इचलकरंजी :** जिल्हास्तरीय रेड रिबन क्लब आयोजित महाविद्यालयीन प्रश्नमंजूषा स्पर्धेत डीकेएएससी महाविद्यालयाने तृतीय क्रमांक प्राप्त केला. सीपीआर हॉस्पिटल आयोजीत जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण पथकातर्फे स्पर्धा महावीर कॉलेज येथे झाल्या. बीएस्सीच्या सौरभ सोनावळे व अनिकेत डोणे या विद्यार्थ्यांनी तृतीय क्रमांक प्राप्त केला. गतवर्षी महाविद्यालयाने सायबर कॉलेज येथे झालेल्या स्पर्धेत द्वितीय क्रमांक प्राप्त केला होता. यशस्वी विद्यार्थ्यांना प्राचार्य डॉ. अनिल पाटील, राष्ट्रीय सेवा योजना विभागप्रमुख प्रा. अरुण कटकोळे, आयजीएम रुग्णालयाच्या सौ. वाघमारे, सौ. कांबळे यांचे मार्गदर्शन लाभले.

CS Scanned with CamScanner

लोकमत
epaper.lokmat.com
कोल्हापूर, मंगळवार, दि. १५ नोव्हेंबर २०२२

# 'डीकेएएससी'मध्ये कार्यशाळा

इचलकरंजी : डीकेएएससी कॉलेजमध्ये 'मोती उत्पादन शेती' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळा झाली. प्राचार्य अनिल पाटील व दिलीप कांबळे यांच्या हस्ते उद्घाटन झाले. कांबळे यांनी मोतीशेती संकल्पना शोध, इतिहास, लघुउद्योगाचे महत्त्व याबाबत मार्गदर्शन केले. डॉ.पी.के. वाघमारे यांनी स्वागत केले. डी.ए. यादव, एस.टी. इंगळे, एस.के. जांभळे, सुप्रिया पाटील उपस्थित होत्या.

Scanned with CamScanner

तरुण भारत    मंगळवार, १५ नोव्हेंबर २०२२

# विद्यार्थ्यांनी जाणून घेतले मोती शेतीचा प्रयोग

## दत्ताजीराव कदम आर्टस, सायन्स अँड कॉमर्स कॉलेजमध्ये कार्यशाळा

**प्रतिनिधी**
इचलकरंजी

मोती कसे बनतात, मोती शेतीतून आपण कसे वेगळ्या पद्धतीने व्यवसाय करू शकतो यासह अनेक गोष्टीची असणारी कुतूहलता युवक व युवतींच्यात पहावयास मिळाली. येथील दत्ताजीराव कदम आर्टस, सायन्स अँड कॉमर्स कॉलेजमध्ये मोती उत्पादन शेती यावर कार्यशाळा आयोजित केली होती. यामध्ये विद्यार्थ्यांमध्ये, याबाबत असणारी जिज्ञासा पाहावयास मिळाली. शिवाजी विद्यापीठाच्या अग्रणी महाविद्यालय योजनेच्या कॉलेज क्लस्टर विजयसिंह यादव कला व विज्ञान महाविद्यालय पेठवडगाव अंतर्गत प्राणीशास्त्र विभागातर्फे मोती उत्पादन शेती यावर एकदिवसीय कार्यशाळा झाली. याचे उद्घाटन प्राचार्य डॉ. अनिल पाटील व प्रमुख अतिथी दिलीप कांबळे यांच्या हस्ते झाले.


संग्रहीत

कांबळे यांनी सर्वसामान्य शेतकरी ते मोती उत्पादक उद्योजक असा प्रवास केला आहे. मोती शेती संकल्पना शोध, इतिहास, मोतीशेती काळाची गरज, मोतीशेती या लघुउद्योगाचे महत्त्व, विविध देशांत चाललेली मोतीशेती, भारतात हा उद्योग वाढवल्यास होणारे फायदे, मोतीचे प्रकार, त्याचे उत्पादन, त्याची गुणवत्ता तपासणी व त्यांचे मानांकन, नैसर्गिक व कृत्रिमरीत्या या दोन्ही शेती करावयाची प्रक्रिया, मृदुकाय प्राणी शिंपल्यांची घ्यावयाची काळजी, प्रत्यक्ष उत्पादन त्यांची विक्री, आयात निर्यात, मोतीशेतीसाठी शासनाच्या योजना व आर्थिक सवलती अशा विषयांवर त्यांनी चर्चा करून मार्गदर्शन केले. विविध देशांत मोती शेती करण्याकडे कल वाढत आहेत. परंतु भारतात ही शेती खूपच अल्प प्रमाणात केली जाते. भारत देशात हा उद्योग वाढवल्यास शेतकऱ्यांची व देशाची आर्थिक उन्नती वाढण्यास मोठी मदत होईल, असे प्रतिपादन दिलीप कांबळे यांनी केले. कार्यशाळेस अग्रणी महाविद्यालय योजनेअंतर्गत येणाऱ्या महाविद्यालयांचे समन्वयक व विद्यार्थी उपस्थित होते. उपप्राचार्य डी. ए. यादव; डॉ. एस. टी. इंगळे, सुप्रिया पाटील उपस्थित होते. प्रास्ताविक व प्रमुख पाहुण्यांची ओळख प्राणीशास्त्र विभागप्रमुख डॉ. पी. के. वाघमारे यांनी करून दिली. सूत्रसंचालन डॉ. रेश्मा सनदी यांनी केले. प्रा. डॉ. निलोफर शेख यांनी आभार मानले.

Scanned with CamScanner

सकाळ
शुक्रवार,
१८ नोव्हेंबर २०२२



इचलकरंजी : डीकेएएससी कॉलेजमध्ये स्वातंत्र्यसेनानी बिरसा मुंडा यांची जयंती साजरी केली.

# बिरसा मुंडा यांची जयंती

**इचलकरंजी :** डी.के.ए.एस.सी.कॉलेजमध्ये जनजातीय गौरव दिवसानिमित्त स्वातंत्र्य सेनानी बिरसा मुंडा यांची जयंती साजरी केली. इतिहास विभाग व सांस्कृतिक विभागातर्फे आयोजन केले. बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेचे पूजन प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांनी केले. इतिहास विभागप्रमुख प्रा. अरुण कटकोळे यांनी स्वातंत्र्यसेनानी मुंडा यांच्या जीवनकार्याची ओळख करून दिली. सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. डी. सी. कांबळे, डॉ. डी. जी. घोडके, डॉ. ए. पी. जाधव, प्रा. डी. ए. यादव, डॉ. सुनीता वेल्हाळ, डॉ. पी. के. वाघमारे आदी उपस्थित होते.

Scanned with CamScanner

तरुण भारत मंगळवार, २२ नोव्हेंबर २०२२

# डीकेएएससीत इंग्रजी भितीपत्रिका प्रदर्शन

इचलकरंजी : आझादी का अमृत महोत्सवनिमित्त स्वातंत्र्य लढ्यामध्ये सहभागी असलेल्या भारतीय इंग्रजीत लिखाण करणाऱ्या लेखकांच्या साहित्याची ओळख करून देण्याच्या उद्देशाने भितीपत्रिकेचे प्रदर्शन आयोजित केले होते. यामध्ये बी. ए. भाग ३ स्पेशल इंग्लिशच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. सुमन सतलगावकर, संजना चौगुले, प्राजक्ता भोसले, प्रथमेश हतकर, अभिषेक यांनी पोस्टरबद्दल माहिती सांगितली. डॉ. जयवंत महाविद्यालयच्या वैजयंती पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांचे प्रोत्साहन मिळाले.

Scanned with CamScanner

सकाळ
बुधवार,
२३ नोव्हेंबर २०२२



इचलकरंजी : डीकेएएससी कॉलेजमध्ये भित्तिपत्रिका प्रदर्शनाच्या उद्घाटनप्रसंगी डॉ. वैजयंती पाटील, डॉ. डी. सी. कांबळे आदी उपस्थित होते.

# 'डीकेएएससी'मध्ये भित्तिपत्रिका प्रदर्शन

इचलकरंजी : डीकेएएससी कॉलेजमध्ये इंग्रजी विभागामार्फत भित्तिपत्रिका प्रदर्शन झाले. भारतीय इंग्रजीत लिखाण करणाऱ्या लेखकांच्या साहित्याची ओळख करून देण्याच्या उद्देशाने या भित्तिपत्रिकेचे प्रदर्शन आयोजित केले. सुमन सतलगावकर, संजना चौगुले, प्रथमेश हतकर यांनी पोस्टरबद्दल माहिती दिली. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. वैजयंती पाटील उपस्थित होत्या. अध्यक्षस्थानी उपप्राचार्य डॉ. डी. सी. कांबळे होते. इतिहासविभाग प्रमुख प्रा. अरुण कटकोळे, डॉ. अंजली उबाळे आदी उपस्थित होते. 'फॅकल्टी एक्स्चेंज अँड स्टुडंटस् मीट' उपक्रमांतर्गत बी. ए. भाग तीन स्पेशल इंग्लिशच्या विद्यार्थ्यांसाठी डॉ. पाटील यांचे व्याख्यान झाले. जयवंत महाविद्यालयातील इंग्रजी विभागाचे विद्यार्थीही उपस्थित होते. दोन्ही उपक्रमांचे नियोजन प्रा. संदीप हरगाणे, प्रा. दीपक देवकर यांनी केले.

CS Scanned with CamScanner

दक्षिण महाराष्ट्र
केसरी
२३ नोव्हेंबर २०२२



इचलकरंजी : दत्ताजीराव कदम कॉलेजमध्ये भितीपत्रिकेच्या अनावरणप्रसंगी वैजयंती पाटील, प्रा. कटकोळे, डॉ. अंजली उबाळे.

# दत्ताजीराव कदम कॉलेजमध्ये भितीपत्रिका प्रदर्शन

**केसरी वृत्तसेवा**

**इचलकरंजी :** आझादी का अमृत महोत्सव निमित्त स्वातंत्र्य लढ्यामध्ये सहभागी असलेल्या भारतीय इंग्रजीत लिखाण करणाऱ्या लेखकांच्या साहित्याची ओळख करून देण्याच्या उद्देशाने सदर भितीपत्रिकेचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले.

यामध्ये बी. ए. III स्पेशल इंग्लिशच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. सुमन सतलगावकर, संजना चौगुले, प्राजक्ता भोसले, प्रथमेश हतकर, अभिषेक यांनी पोस्टरबद्दल माहिती सांगितली. प्रमुख पाहुणे म्हणून जयवंत महाविद्यालय येथील डॉ. वैजयंती पाटील उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. डी. सी. कांबळे यांनी हा स्तुत्य उपक्रम राबविल्याबद्दल अभिनंदन केले.

यावेळी इतिहास विभाग प्रमुख प्रा. कटकोळे, डॉ. अंजली उबाळे आदी प्राध्यापकवर्ग उपस्थित होते. ओमकार बेलेकर याने भितीपत्रिके बाबत विचार व्यक्त केले. रेहान सय्यद याने सूत्रसंचालन, आभार रितेश घमंडे याने मानले. दोन्ही उपक्रमांचे नियोजन प्रा. संदीप हरगाणे व प्रा. दीपक देवकर यांनी केले. कार्यक्रमासाठी डॉ. डी. जी. घोडके, प्रा. नम्रता ताटे, प्रा. श्रद्धा बरगाले, प्रा. केशर धरणगुते यांचे सहकार्य लाभले. हे कार्यक्रम डॉ. सुनिता वेल्हाळ यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आले.

Scanned with CamScanner

सकाळ
शुक्रवार,
२५ नोव्हेंबर २०२२



इचलकरंजी : विभागीय क्रिकेट स्पर्धेसाठी निवड झालेल्या डीकेएएससी कॉलेजच्या संघासमवेत मार्गदर्शक प्राध्यापक.

## 'डीकेएएससी'ची विभागीयसाठी निवड

**इचलकरंजी :** विभागीय क्रिकेट स्पर्धेसाठी डीकेएएससी कॉलेजच्या संघाची निवड झाली. जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय कोल्हापूर व इचलकरंजी महानगरपालिका आयोजित शासकीय शालेय क्रिकेट स्पर्धेत कॉलेजच्या मुलींच्या संघाने अंतिम सामन्यात कन्या महाविद्यालयाचा पराभव करून विजेतेपद पटकावले. संघाची सातारा येथे होणाऱ्या विभागीय विभागीय क्रिकेट स्पर्धेसाठी निवड झाली आहे. संघात कर्णधार मृणाली खोत, उपकर्णधार समीक्षा अडसुळे, अंकिता मिश्रा, समृद्धी माळी, आम्रपाली कांबळे, संध्याराणी कोळी, सृष्टी कगुडे, रसिका वने, प्रतीक्षा अडसुळे, गीता बारीक, वैष्णवी शिंदे, सुरेखा फरकटे, मिजान ऐतवडे, सोनल खोत, स्नेहल पुजारी, श्रावणी सांगावी या खेळाडूंचा समावेश होता. खेळाडूंचा प्राचार्य डॉ. अनिल पाटील, उपप्राचार्य डॉ. डी. सी. कांबळे, प्रा. डी. ए. यादव, अधीक्षक सुनील महाडिक यांच्या हस्ते सत्कार केला. संघास प्रा. मेजर मोहन वीरकर, प्रा. मुजफ्फर लगीवाले, प्रा. प्रशांत कांबळे यांचे मार्गदर्शन लाभले.

Scanned with CamScanner

सकाळ
सोमवार, २८ नोव्हेंबर २०२२

# उद्देशिका वाचनातून संविधानाचा जागर

**डीकेएएससी कॉलेज**

प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख डॉ. एस. टी. इंगळे यांनी संविधान जनजागृतीबाबत मनोगत व्यक्त केले. विद्यार्थी, प्राध्यापकानी संविधान प्रास्ताविकेचे वाचन केले. उपप्राचार्य डॉ. डी. सी. कांबळे, प्रा.डी. ए. यादव, मेजर मोहन वीरकर, अरुण कटकोळे आदी उपस्थित होते.

Scanned with CamScanner

सकाळ
मंगळवार,
२९ नोव्हेंबर २०२२



इचलकरंजी : शासकीय जिल्हास्तरीय कुस्ती स्पर्धेत डीकेएएससी कॉलेजने यश मिळवले.

# 'डीकेएएससी'चे कुस्ती स्पर्धेत यश

**इचलकरंजी, ता. २८ :** शासकीय कुस्ती स्पर्धेत डीकेएएससी कॉलेजने यश मिळवले. जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय कोल्हापूर आणि इचलकरंजी महानगरपालिका यांच्यातर्फे या जिल्हास्तरीय कुस्ती स्पर्धा झाल्या.

१७ वर्षे फ्री स्टाईल गटातील मुलांमध्ये राज हजारे याने प्रथम, ऋतुराज मगदूम या स्पर्धकाने ७१ किलो वजनी गटामध्ये प्रथम, तर मुलींमध्ये याच प्रकारात श्रावणी सांगावे द्वितीय, तर सोनल खोतने प्रथम क्रमांक मिळवला. १९ वर्षीय गटातील मुलांमध्ये फ्री स्टाईल प्रकारात प्रणव पुजारी प्रथम, आदित्य काळगे याने द्वितीय क्रमांक मिळवला. तसेच याच स्पर्धा प्रकारांमध्ये करण चव्हाण, आरिफ शेख, महेश कोडगीर, प्रदीप अनुसे या सर्वांनी आपापल्या गटामध्ये प्रथम क्रमांक मिळवला. १९ वर्षे फ्री स्टाईल मुलींच्या गटामध्ये स्नेहा पुजारीने प्रथम क्रमांक मिळवला. १७ वर्षे वयोगटातील ग्रीक रोमन कुस्ती स्पर्धेमध्ये राजवर्धन जाधव याने ६५ किलो वजनी गटामध्ये प्रथम क्रमांक, १९ वर्षे गटात अवधूत मस्के यांनी ५५ किलो वजन गटामध्ये प्रथम क्रमांक मिळवला. या जिल्हास्तरीय कुस्ती स्पर्धेत डीकेएएसएसीचे वर्चस्व राहिले. या सर्व स्पर्धकांची खासबाग कुस्ती मैदान कोल्हापूर येथे होणाऱ्या विभागीय कुस्ती स्पर्धेसाठी निवड झालेली आहे. खेळाडूंचे प्राचार्य डॉ. अनिल पाटील, उपप्राचार्य डॉ. डी. सी. कांबळे, प्रा. डी. ए. यादव, अधीक्षक सुनील महाडिक यांनी सत्कार केला. मेजर मोहन वीरकर प्रा. मुझफ्फर लगीवाले, प्रा. प्रशांत कांबळे यांचे मार्गदर्शन लाभले.

Scanned with CamScanner

सकाळ

शुक्रवार,
२ डिसेंबर २०२२



इचलकरंजी : क्रिकेट आणि कबड्डी खेळांमध्ये विजयी डीकेएएससी महाविद्यालयाच्या मुलींच्या संघाबरोबर कौस्तुभ गावडे, राम साळुंखे आदी.

## डीकेएएससी महाविद्यालय विजेते

इचलकरंजी : नुकत्याच झालेल्या जिल्हास्तरीय शासकीय क्रीडा स्पर्धेत डीकेएएससी महाविद्यालयाच्या मुलींच्या संघाने क्रिकेट आणि कबड्डीत विजेतेपद पटकावले. त्याबद्दल स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे आणि संस्थेचे आजीव सेवक राम साळुंखे यांनी दोन्ही संघांचे अभिनंदन आणि कौतुक केले. दोघांनी संस्थात्मक कामासाठी इचलकरंजी येथे सदिच्छा भेट दिली. प्राचार्य डॉ. अनिल पाटील, मेजर मोहन वीरकर, बापूजी साळुंखे हायस्कूलचे मुख्याध्यापक श्री. पाटील, प्रा. प्रशांत कांबळे आदी उपस्थित होते.

Scanned with CamScanner

लोकमत
epaper.lokmat.com
शनिवार, दि. ३ डिसेंबर २०२२

## डीकेएएससी महाविद्यालय विजेते

इचलकरंजी : जिल्हास्तरीय शासकीय क्रीडा स्पर्धेत डीकेएएससी महाविद्यालय मुलींच्या संघाने क्रिकेट आणि कबड्डीत विजेतेपद पटकावले. स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कौस्तुभ गावडे व राम साळुंखे यांनी दोन्ही संघांचे कौतुक केले. यावेळी प्राचार्य अनिल पाटील, मेजर मोहन वीरकर, प्रशांत कांबळे आदी उपस्थित होते.

CS Scanned with CamScanner

पुढारी , रविवार, ४ डिसेंबर २०२२

# कदम कॉलेजमध्ये भित्तिपत्रिकेचे प्रकाशन

**इचलकरंजी :** येथील दत्ताजीराव कदम आर्टस्, सायन्स व कॉमर्स कॉलेज मधील कॉमर्स विभागातर्फे शुक्रवारी 'कायदे व त्यांचे नियमन' या विषयावरील भित्तिपत्रिका बीकॉम भाग तीनच्या विद्यार्थ्यांनी सादर केली. भित्तिपत्रिकेचे प्रकाशन विघ्नेश जोशी यांनी केले. सकाळ व दुपारच्या सत्रातील प्र-प्राचार्य डॉ. डी. सी. कांबळे व प्रा. डी. ए. यादव यांच्या हस्ते झाले. यावेळी प्राचार्य डॉ. अनिल पाटील, प्रा. विजय पाटील, डॉ. रिता रॉड्रिक्स, प्रा. मृणाली पाटील, प्रा. निकिता करांडे आदी उपस्थित होते.

Scanned with CamScanner

# डी. के. ए. एस. सी. मध्ये बीसीए विभागाचा दीक्षारंभ समारंभ संपन्न

**जनप्रवास । प्रतिनिधी**

**इचलकरंजी :** येथील दत्ताजीराव कदम आर्टस्, सायन्स अँड कॉमर्स कॉलेज, इचलकरंजी येथे बी.सी.ए. विभागातर्फे बी.सी.ए. भाग - १ च्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित दीक्षारंभ समारंभ संपन्न झाला. प्रमुख पाहुणे म्हणून चला हवा येऊ द्या फेम यूट्यूबस्टार, हास्यसम्राट अभी रोकडे हे उपस्थित होते.

आपल्या मार्गदर्शनात त्यांनी सोशल मिडीयाकडे फक्त मनोरंजनाचे साधन म्हणून न बघता यामध्ये करिअर कसे करता येईल यासाठी प्रयत्नशील असणे गरजेचे आहे असे मत व्यक्त केले. सदर समारंभात त्यांनी विविध विनोदी प्रहसन सादर करून सर्वांना खळखळून हसविले व दिलखुलास मनोरंजन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उप-प्राचार्य प्रा. डी. ए. यादव उपस्थित होते. त्यांनी उपस्थित नवप्रवेशित विद्यार्थ्यांचे महाविद्यालयातर्फे स्वागत केले.



दत्ताजीराव कदम महाविद्यालयात बीसीए विद्यार्थ्यांच्या दीक्षारंभ समारंभात हास्यसम्राट अभी रोकडे यांचे स्वागत करताना प्राचार्य डॉ. अनिल पाटील, उप प्राचार्य प्रा. डी.ए.यादव सोबत रणजीत माने.

आपल्या मार्गदर्शनात त्यांनी विद्यार्थ्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या. विविध कलागुणांना चालना देण्यासाठी असे उपक्रम होणे गरजेचे आहेत असे मत व्यक्त केले. तसेच हा उपक्रम राबविलेबद्दल विभागाचे अभिनंदन केले.

बी.सी.ए. भाग - २ व ३ च्या विद्यार्थ्यांनी नवप्रवेशित विद्यार्थ्यांना विविध उपक्रमांच्या माध्यमातून महाविद्यालयाची ओळख करून दिली. कार्यक्रमात विभागातील विद्यार्थ्यांनी विविध कला-गुणात्मक व मनोरंजनात्मक कलाविष्कार सादर केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांचे मार्गदर्शन मौलिक ठरले. कार्यक्रमास यूट्यूबस्टार रणजीत माने यांची प्रमुख उपस्थिती लाभली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक बी.सी.ए. विभाग प्रमुख अक्षय स्वामी यांनी केले व आभार राहुल माने या विद्यार्थ्याने मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अर्चिता भोसले व तेजस्विनी अवघडी यांनी केले.

कार्यक्रमाच्या संयोजनात डॉ. सुलभा गाठ, संजय पाटील, चेतन पाटील, विनायक पाटील, विजय सूर्यवंशी, जुबेर खतीब, सुप्रिया माळी, ऋषिराज माने व सलीम जमादार यांच्यासह प्रशासकीय सहकारी अझर दाढीवाले, तौफिक नाईकवाडे, रमेश रावण, रवी मेटी यांनी योगदान दिले.

तरुण भारत / सोमवार, ५ डिसेंबर २०२२

# डीकेएएससीमध्ये कायदे भित्तिपत्रिकेचे अनावरण

**इचलकरंजी :** येथील दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स व कॉमर्स कॉलेजमधील कॉमर्स विभागातर्फे कायदे व त्यांचे नियमन विषयावरील भित्तीपत्रिका बी. कॉम. भाग तीनच्या विद्यार्थ्यांनी सादर केली. याचे उद्घाटन विघ्नेश जोशी तसेच सकाळ व दुपार सत्रातील प्र. प्राचार्य डॉ. डी. सी. कांबळे व प्रा. डी. ए. यादव यांच्या हस्ते झाले. भित्तिपत्रिकेत बौद्धिक संपादन हक्क, कर्मचारी विमा कायदा,भारतीय दंड संहिता, वस्तू व सेवा कर, हरित लवाद, पेटंट व कॉपीराईट कायदा, सायबर गुन्हे, आयात निर्यात कायदा, कर्मचारी भविष्य निर्वाह निधी कायदा, मोटर वाहन कायदा तसेच पोक्सो, शक्ती व लैंगिक छळ प्रतिबंधक कायदा इ. विषयांवर विद्यार्थ्यांनी पोस्टरद्वारे महत्त्वाच्या माहितींचे सादरीकरण विवेचनाद्वारे केले. या उपक्रमात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग दर्शविला. विद्यार्थ्यांच्या कल्पनास अधिक वाव मिळावा तसेच अभ्यासक्रमाची तयारी, वाचन व लिखाण व्हावे, या हेतूने भितीपत्रिकाचे आयोजन केले होते. प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. यावेळी प्रा. विजय पाटील, डॉ. रिता रॉड्रिक्स, प्रा. मृणाली पाटील, प्रा. निकिता करांडे, प्राध्यापक उपस्थित होते. सूत्रसंचालन सानिया नायकवडी हिने केले. आभार प्रतीक्षा पॅटी हिने मानले.

Scanned with CamScanner

# डी.के.ए.एस.सी.मध्ये बी.सी.ए. विभागाचा दीक्षारंभ समारंभ

**इचलकरंजी :** येथील दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स कॉलेज, इचलकरंजी येथे बी.सी.ए. विभागातर्फे बी.सी.ए.च्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित दीक्षारंभ समारंभ संपन्न झाला. प्रमुख पाहुणे म्हणून चला हवा येऊ द्या फेम यूट्यूबस्टार, हास्यसम्राट अभी रोकडे हे उपस्थित होते. मार्गदर्शन करताना त्यांनी सोशल मिडीयाकडे फक्त मनोरंजनाचे साधन म्हणून न बघता यामध्ये करिअर कसे करता येईल यासाठी प्रयत्नशील असणे गरजेचे आहे, असे मत व्यक्त केले. अध्यक्षस्थानी उपप्राचार्य डी. ए. यादव होते. त्यांनी उपस्थित नवप्रवेशित विद्यार्थ्यांचे महाविद्यालयातर्फे स्वागत केले. विद्यार्थ्यांनी विविध कला-गुणात्मक व मनोरंजनात्मक कलाविष्कार सादर केले. प्रास्ताविक अक्षय स्वामी यांनी केले. आभार राहुल माने यांनी मानले. सूत्रसंचालन अर्चिता भोसले यांनी केले.

केसरी

9921600800

5-12-2022

सकाळ
कोल्हापूर, सोमवार, ५ डिसेंबर २०२२

# विद्यार्थ्यांनी अवांतर वाचन करावे : जोशी

## डीकेएएससी महाविद्यालयात कार्यशाळा

**इचलकरंजी, ता. ४ :** भाषा ही व्यक्तिमत्त्व विकासाला आकार देण्याचे कार्य करते. निवेदन, सूत्रसंचालन आणि मुलाखत या तंत्रामध्ये भाषेबरोबरच निरीक्षण, साहित्य, नाट्य, संगीत, अन्य कला, संस्कृती आदींची जाण असणाऱ्या बहुश्रुत व्यक्तिमत्त्वाची आवश्यकता असते. यासाठी विद्यार्थ्यांना अवांतर विस्तृत वाचन करणे हाच मूलमंत्र आहे, असे प्रतिपादन प्रसिद्ध अभिनेते विघ्नेश जोशी यांनी केले.

येथील दत्ताजीराव कदम आर्टस्, सायन्स अँड कॉमर्स कॉलेज येथे रोटरी क्लब ऑफ अतिग्रेतर्फे आयोजित 'निवेदन, सूत्रसंचालन आणि मुलाखत'' या विषयावर आयोजित कार्यशाळेत ते बोलत होते. श्री. जोशी यांनी विद्यार्थ्यांना पूरक माहिती देत प्रात्यक्षिकांतून निवेदन, सूत्रसंचालन आणि मुलाखतीच्या तंत्राविषयी प्रबोधन केले.



**इचलकरंजी : कार्यशाळेत प्रात्यक्षिकांतून मार्गदर्शन करताना अभिनेते विघ्नेश जोशी.**

प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांच्या मार्गदर्शनखाली कार्यक्रम झाला. रोटरी क्लब अतिग्रेचे राजकुमार थोरवत, प्रा. सौ. संगीता पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यशाळेत विद्यार्थ्यांनी प्रश्नांसंबंधी हितगुज करीत श्री. जोशी यांच्याशी प्रात्यक्षिक कार्यात सहभाग नोंदवला.

प्रास्ताविक उपप्राचार्य डॉ. डी. सी. कांबळे यांनी केले. उपप्राचार्य प्रा. डी. ए. यादव यांनी आभार मानले.

Scanned with CamScanner

# 'निवेदन' विषयावर इचलकरंजीत कार्यशाळा

**इचलकरंजी :** येथील दत्ताजीराव कदम आर्टस, सायन्स अँड कॉमर्स कॉलेज, इचलकरंजी व रोटरी क्लब ऑफ अतिग्रे यांच्या संयुक्त विद्यमाने 'निवेदन, सूत्रसंचालन आणि मुलाखत' या विषयावर कार्यशाळा संपन्न झाली. कार्यशाळेत प्रमुख पाहुणे म्हणून सुप्रसिद्ध अभिनेते विघ्नेश जोशी यांनी मार्गदर्शन केले.



**इचलकरंजी : 'निवेदन, सूत्रसंचालन आणि मुलाखत' या विषयावरील कार्यशाळेत मार्गदर्शन करताना प्रमुख पाहुणे सुप्रसिद्ध अभिनेते विघ्नेश जोशी.**

ते म्हणाले, भाषा ही आपल्या व्यक्तिमत्त्व विकासाला आकार देण्याचे कार्य करते. निवेदन, सूत्रसंचालन आणि मुलाखत या तंत्रामध्ये भाषेबरोबरच निरीक्षण, साहित्य, नाट्य, संगीत, अन्य कला, संस्कृती इ.जाण असणाऱ्या बहुश्रुत व्यक्तिमत्त्वाची आवश्यकता असते. यासाठी विद्यार्थ्यांनी अवांतर विस्तृत वाचन करणे हाच मूलमंत्र आहे.

विघ्नेश जोशी यांनी विद्यार्थ्यांना संबंधित विषयाची माहिती देत काही प्रात्यक्षिकांतून निवेदन, सूत्रसंचालन आणि मुलाखतीच्या तंत्राविषयी उद्बोधन केले. यावेळी प्राचार्य डॉ. अनिल पाटील, रोटरी क्लब ऑफ अतिग्रे सदस्य राजकुमार थोरवत आणि संगीता पाटील यांची उपस्थिती लाभली. विद्यार्थ्यांनी प्रश्नांसंबंधी हितगुज करीत विघ्नेश जोशी यांच्याशी प्रात्यक्षिक कार्यात सहभाग नोंदवला. प्रास्ताविक डॉ. डी. सी. कांबळे यांनी केले, आभार प्रा. डी. ए. यादव यांनी मानले. कार्यक्रमास डॉ. सुनिता वेल्हाळ, डॉ. डी. जी. घोडके, प्रा. अरुण कटकोळे, प्रा. विजय यादव उपस्थिती होते.कार्यशाळेच्या संयोजनात प्रा. भारती कोळेकर आणि डॉ. ज्ञानेश्वर कांबळे यांनी योगदान दिले. सूत्रसंचालन प्रा. संजय सुतार यांनी केले.

केसरी
9921600800
5-12-2022

सकाळ
सोमवार,
५ डिसेंबर २०२२

# 'विभागीय'साठी २५ खेळाडू पात्र

## इचलकरंजीमध्ये प्रथमच जिल्हास्तरीय बॉक्सिंग स्पर्धा

**इचलकरंजी, ता. ४ :** इचलकरंजी महानगरपालिका झाल्यानंतर क्रीडाजगतात शहराला जिल्हा दर्जा प्राप्त झाला. त्यामुळे पहिल्यांदाच शहरात जिल्हास्तरीय बॉक्सिंग स्पर्धा झाल्या. डीकेएएसएसी महाविद्यालयामध्ये स्पर्धेचे आयोजन केले.

स्पर्धेचे उद्घाटक जिल्हा बॉक्सिंग असोसिएशनच्या सचिव सौ. आरती कामटे यांच्या हस्ते झाले. प्राचार्य डॉ. अनिल पाटील, महानगरपालिकेचे जनसंपर्क अधिकारी नितीन बनगे यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रत्येक वयोगटातून एक खेळाडू असे एकूण दोन्ही स्पर्धेसाठी प्रत्येकी २५ खेळाडू विभागीय स्पर्धेसाठी पात्र ठरले आहेत.

जिल्हा क्रीडा कार्यालय, जिल्हा क्रीडाधिकारी कोल्हापूर व इचलकरंजी महानगरपालिका, दत्ताजीराव कदम एएससी महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने या स्पर्धा झाल्या. क्रीडा अधिकारी शंकर पोवार यांनी मनोगत व्यक्त केले. प्रा. शेखर शहा यांनी स्वागत केले. बॉक्सिंगसाठी सौ. कामटे, सहसचिव मनोज घाटगे, प्रशांत मोटे, उदय पवार, नाझील नदाफ, तर किक बॉक्सिंगसाठी प्रशांत निराळे, नीलेश परीट, सुशांत माने, विद्यासागर महाजन, यासीन मुल्ला यांनी पंच म्हणून काम पाहिले. स्पर्धेचे नियोजन व खेळ प्रमुख म्हणून प्रा. मेजर मोहन वीरकर, प्रशांत कांबळे, प्रतीक कदम यांनी या नियोजन केले. स्पर्धेसाठी २०० खेळाडूंनी सहभाग घेतला. विजेत्या प्रत्येक गटातून एक खेळाडू असे दोन्ही स्पर्धेतून २५ खेळाडूंची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

स्पर्धेतील विजेत्यांचा निकाल खालीलप्रमाणे - वयोगट १९ वर्षे मुले - प्रथमेश खुळ (४६ किलो), प्रणव पेटकर (४९ किलो) सिद्धार्थ गावडे (५६ किलो), विकास सावंत (६४ किलो), आदित्य जोगदंडे (६० किलो), रामानुज सिंग (७५ किलो), मुली - तृप्ती कांबळे (४८ किलो), प्रणिता पाटील (५४ किलो). १७ वर्षे मुले - प्रथमेश पुणेकर (४८ किलो), प्रेम लोंढे (५० किलो), प्रणव कांबळे. (५२ किलो), दक्ष शिरगावे (६० किलो), अरुण माळी (७५ किलो), जिंदाल चाऊस (८० किलो), धीरज सास्वत (८०+किलो). मुली - आर्याश्री कदम (४२ किलो), रोहिणी खाडे (४४ किलो), अमृता जाधव (४६ किलो) अवंतिका सावंत (४८ किलो), गायत्री पेटकर (५० किलो), साक्षी जाधव (५२ किलो). १४ वर्षे मुले रितेश कुराडे (३२ किलो ) प्रथम.



इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयात जिल्हास्तरीय बॉक्सिंग व किक बॉक्सिंग स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी सौ. आरती कामटे, प्राचार्य डॉ. अनिल पाटील, नितीन बनगे, शंकर पोवार.

Scanned with CamScanner

सकाळ

सोमवार,
५ डिसेंबर २०२२

## 'डीकेएएससी'मध्ये रक्त तपासणी

**इचलकरंजी :** डीकेएएससी महाविद्यायात राष्ट्रीय सेवा योजना व राष्ट्रीय छात्र सेना यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत रक्त तपासणी शिबिर आणि एड्स व एचआयव्ही जनजागृती या विषयावर व्याख्यान झाले. सौ. अर्चना वाघमारे यांनी माहिती दिली. अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. डी. ए. यादव होते. प्रा. डॉ. डी. सी. कांबळे यांनी मनोगत व्यक्त केले. इंदिरा गांधी सामान्य रुग्णालयातील श्री. ओनामे, आदींनी ७८ विद्यार्थ्यांची रक्त तपासणी केली. पाहुण्याची ओळख प्रा. डॉ. अनिल जांभळे यांनी करून दिली.

Scanned with CamScanner

पुरस्कार प्राप्त झाला.

सकाळ 05/12/2022




**इचलकरंजी : सौ. प्रतिभा पैलवान यांना भारतरत्न डॉ. बी. आर. आंबेडकर पुरस्कार मिळाल्याबद्दल एएससी महाविद्यायाच्या एनसीसी विभागाचा सत्कार केला.**

# प्रतिभा पैलवान यांचा सत्कार

**इचलकरंजी :** कन्या महाविद्यालयातील मराठी विभागात प्राध्यापिका कवयित्री सौ. प्रतिभा पैलवान यांना संविधान दिनानिमित्त भारतरत्न डॉ. बी. आर. आंबेडकर नॅशनल एक्सलन्स ॲवॉर्ड न्यू दिल्ली येथील महाराष्ट्र सदनात दिला. यानिमित्त डीकेएएससी महाविद्यालयातील एनसीसी विभागातर्फे प्रा. पैलवान यांचा एनसीसी प्रमुख मेजर मोहन वीरकर यांच्याहस्ते सत्कार झाला. संविधान सन्मान दिवस समारोह समितीतर्फे दिला जाणारा हा पुरस्कार मानाचा समजाला जातो. प्रा. पैलवान यांनी वर्षभर केलेल्या कामाचा आढावा घेऊन त्यांना हा पुरस्कार प्रदान केला.

CS Scanned with CamScanner

सकाळ
मंगळवार,
६ डिसेंबर २०२२



इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयात दीक्षारंभ समारंभात अभी रोकडे यांचे स्वागत प्रा. डी. ए. यादव यांनी केले.

## 'डीकेएएससी'मध्ये दीक्षारंभ समारंभ

**इचलकरंजी :** डीकेएएससी महाविद्यालयात बीसीए विभागाचा दीक्षारंभ समारंभ झाला. प्रमुख पाहुणे म्हणून हास्यसम्राट अभी रोकडे उपस्थित होते. सोशल मीडियाकडे फक्त मनोरंजनाचे साधन म्हणून न बघता यामध्ये करिअर कसे करता येईल यासाठी प्रयत्नशील असणे गरजेचे आहे, असे मत त्यांनी व्यक्त केले. अध्यक्षस्थानी उपप्राचार्य प्रा. डी. ए. यादव उपस्थित होते. उपस्थित नवप्रवेशित विद्यार्थ्यांचे महाविद्यालयातर्फे स्वागत करण्यात आले. बीसीए भाग २ व ३ च्या विद्यार्थ्यांनी नवप्रवेशित विद्यार्थ्यांना विविध उपक्रमांच्या माध्यमातून महाविद्यालयाची ओळख करून दिली. विद्यार्थ्यांनी विविध कलागुणात्मक व मनोरंजनात्मक कलाविष्कार सादर केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. प्रास्ताविक बीसीए विभागप्रमुख प्रा. अक्षय स्वामी यांनी केले. आभार राहुल माने यांनी मानले. सूत्रसंचालन अर्चिता भोसले व तेजस्विनी अवघडी यांनी केले. संयोजन प्रा. डॉ. सुलभा गाठ, प्रा. संजय पाटील, प्रा. चेतन पाटील, प्रा. विनायक पाटील, प्रा. विजय सूर्यवंशी, प्रा. जुबेर खतीब, प्रा. सौ. सुप्रिया माळी, प्रा. ऋषिराज माने, प्रा. सलीम जमादार आदींनी केले.

Scanned with CamScanner

# दत्ताजीराव कदम कॉलेजमध्ये कायदे विषयावरील भित्तिपत्रिका कार्यक्रम

**केसरी वृत्तसेवा**

**इचलकरंजी :** येथील दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स व कॉमर्स कॉलेजमधील कॉमर्स विभागातर्फे कायदे व त्यांचे नियमन विषयावरील भित्तिपत्रिका बी कॉम भाग तीनच्या विद्यार्थ्यांनी सादर केली. भितीपत्रिकाचे उद्घाटन विघ्नेश जोशी तसेच सकाळ व दुपार सत्रातील प्र. प्राचार्य डॉ. डी. सी. कांबळे व प्रा. डी. ए. यादव यांच्या हस्ते संपन्न झाले.



कायदे विषयावरील भित्तीपत्रिकेचे उद्घाटन विघ्नेश जोशी, प्र. प्राचार्य डॉ. डी. सी. कांबळे व प्रा. डी. ए. यादव यांच्या हस्ते झाले.

भित्तिपत्रिकेत बौद्धिक संपादन हक्क, कर्मचारी विमा कायदा, भारतीय दंड संहिता, वस्तू व सेवा कर, हरित लवाद पेटंट व कॉपीराईट कायदा, सायबर गुन्हे, आयात निर्यात कायदा, कर्मचारी भविष्य निर्वाह निधी कायदा, मोटर वाहन कायदा तसेच प्कोसो, शक्ती व लैंगिक छळ प्रतिबंधक कायदा इ. विषयांवर विद्यार्थ्यांनी पोस्टरद्वारे महत्त्वाच्या माहितींचे सादरीकरण विवेचनाद्वारे केले.

प्राचार्य डॉ अनिल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली उपक्रम संपन्न झाला. कार्यक्रमास प्रा. विजय पाटील, डॉ. रिता रॉड्रिक्स, प्रा. मृणाली पाटील, प्रा. निकिता करांडे उपस्थित होते. सूत्रसंचालन सानिया नायकवडी या विद्यार्थिनीने केले.

*** पुणे :** बँकॉक थायलंड येथे नुकत्याच झालेल्या आंतरराष्ट्रीय जिम्नॅस्टिक स्पर्धेमध्ये सूर्यदत्त नॅशनल स्कूलच्या शांभवी सरोजने कांस्यपदक पटकावले. शांभवीच्या या यशाबद्दल तिचे कौतुक केले.

केसरी

9921600800

6-12-2022

पुढारी
शुक्रवार, ९ डिसेंबर २०२२

# डीकेएएससी महाविद्यालयाचे यश

**इचलकरंजी :** शिवाजी विद्यापीठाच्या वतीने आयोजित विद्यापीठ आविष्कार स्पर्धेत येथील डीकेएएससी महाविद्यालयाच्या सिमरन मुजावर या विद्यार्थिनीच्या 'शेती कचऱ्यापासून सिलिका निष्कर्षण' या प्रयोगाला प्युअर सायन्स या विभागातून तृतीय पारितोषिक मिळाले. तिला प्राचार्य डॉ. अनिल पाटील, समन्वयक डॉ. दीपक कुंभार, प्रा. स्विटी फडतरे यांचे मार्गदर्शन लाभले.

CS Scanned with CamScanner

तरुण भारत शनिवार, १० डिसेंबर २०२२

# डीकेएएससी कॉलेजचे अविष्कार स्पर्धेत यश

**इचलकरंजी** : शिवाजी विद्यापीठामार्फत आयोजित विद्यापीठ अविष्कार स्पर्धेत डीकेएएससी कॉलेजच्या सिमरन सरदार मुजावर बी. एस्सी. भाग ३ (रसायनशास्त्र) हिला प्युअर सायन्स या विभागातून शेती कचऱ्यापासून सिलिका निष्कर्षण या प्रयोगाला तृतीय पारितोषिक मिळाले.

यासाठी प्राचार्य डॉ. अनिल पाटील, समन्वयक डॉ. दीपक कुंभार, प्रा. स्विटी फडतरे व रिसर्च प्रमोशन अँड मोनिटरिंग कमिटीचे सदस्य, गुरुदेव कार्यकर्ते यांचे सहकार्य लाभले.



**इचलकरंजी : अविष्कार स्पर्धेतील डीकेएएससी कॉलेजच्या सिमरन मुजावर हिचा सत्कार करताना मान्यवर.**

Scanned with CamScanner

दक्षिण महाराष्ट्र केसरी

१२ डिसेंबर २०२२/६

# डी.के.ए.एस.सी.मध्ये भारतीय भाषा दिवस

इचलकरंजी : येथील दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स कॉलेज येथे थोर साहित्यिक चिन्नास्वामी सुब्रमण्यम भारती यांची जयंती भारतीय भाषा दिवस म्हणून उत्साहात साजरी करण्यात आली.

याप्रसंगी बोलताना प्रमुख पाहुणे प्रा. सुधाकर इंडी म्हणाले, भाषा ही आपल्या जगण्याचा भाग आहे. इतकेच नव्हे तर भाषा ही रोजगाराचे साधन म्हणून तिचे महत्त्व नव्याने अधोरेखित होत आहे. नवीन शिक्षण धोरणात भारतीय भाषांचा विकास साधून त्यायोगे राष्ट्रीय एकात्मता व देशाची अखंडता वर्धिष्णू ठेवण्याचे उद्दिष्ट आहे.

कार्यक्रमात महाविद्यालयातील विविध भाषिक समाजातील प्रतिनिधी विद्यार्थ्यांनी मराठी, हिंदी, इंग्रजी, कोंकणी, मालवणी, भोजपुरी, उर्दू, मारवाडी, गुजराती, मैथिली, कन्नड इ. भाषांमधून देशप्रेम व्यक्त करत राष्ट्रे एकात्मतेचे महत्त्व विशद केले.य. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान डॉ. डी. सी. कांबळे यांनी भूषविले.

यावेळी प्रा. डी. ए. यादव, डॉ. डी. जी. घोडके, प्रा. व्ही. पी. पाटील, प्रा. अरुण कटकोळे उपस्थित होते. प्रास्ताविक प्रा. संजय सुतार यांनी केले, आभार डॉ. सुनिता वेल्हाळ यांनी मानले. सूत्रसंचालन डॉ.अंजली उबाळे यांनी केले.

CS Scanned with CamScanner

दक्षिण महाराष्ट्र
केसरी
१२ डिसेंबर २०२२/४



विनायक खामकर यांची महाराष्ट्र शासनाच्या राज्यकर निरीक्षक पदावर नुकतीच नियुक्तीबद्दल त्यांचा सत्कार केला.

## विनायक खामकरचे स्पर्धा परीक्षेत यश

इचलकरंजी : येथील दत्ताजीराव कदम आर्टस, सायन्स अँड कॉमर्स कॉलेजच्या विनायक प्रकाश खामकर यांची महाराष्ट्र शासनाच्या राज्यकर निरीक्षक पदावर नुकतीच नियुक्ती झाली आहे. ग्रामीण भागातून अल्पशिक्षित कुटुंबात जन्मलेल्या खामकर यांनी जिद्द चिकाटीच्या बळावर हे यश संपादन केले आहे.

Scanned with CamScanner

दक्षिण महाराष्ट्र

केसरी

१३ डिसेंबर २०२२/५

# बँकिंग व विमा क्षेत्रात करिअरच्या अनेक संधी : डॉ. अनिल पाटील

केसरी वृत्तसेवा

**इचलकरंजी** : बँकिंग व विमा क्षेत्रात करिअरच्या अनेक संधी असल्याचे, डॉ. अनिल पाटील यांनी सांगितले.

इचलकरंजी येथील दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स व कॉमर्स महाविद्यालयात बँकिंग क्षेत्रातील करिअर संधी कार्यशाळा झाली, यावेळी ते बोलत होते.

कार्यशाळेत फ्युचर अकॅडमीचे स्वप्निल तांबे यांनी मार्गदर्शन केले. प्रारंभी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मृतीस अभिवादन व्यक्त केले. कार्यशाळेत मार्गदर्शन करताना डॉ. अनिल पाटील म्हणाले की, तुलनात्मकदृष्ट्या खाजगी क्षेत्रात पगार कमी आहेत, नोकरीतील सुरक्षितता, बढती, नोकऱ्यांच्या संधी, तसेच समाजाप्रती उत्तरदायित्वाची भावना यामुळे महाविद्यालयीन पदवीधर बँकिंग व विमा क्षेत्रातील आयबीपीएस, विमा, रेल्वे व पदवी स्तरावरील संयुक्त परिक्षा परीक्षांकडे अधिक आकर्षित होत आहेत. बँकिंग क्षेत्रातील कामाचे स्वरूप, आर्थिक सेवा व्यावसायिकता, राष्ट्रीयकृत बँकांमधील पसंती क्रम, मार्केटिंग, माहिती तंत्रज्ञान यामुळे विशेषता बँकिंग क्षेत्रातील आकर्षण वाढत आहे. आयबीपीएस, स्टेट बँक, रिझर्व बँक, विभागीय ग्रामीण बँका यांच्या परीक्षांचे नियोजन, वार्षिक कार्य वेळापत्रक, अभ्यासक्रम व त्यातील इंग्लिश, बुद्धिमत्ता चाचणी व गणित या विषयांबद्दल विस्तृत माहिती विशद केली. स्वागत प्रा. विजय पाटील यांनी केले. प्रा. मृणाली पाटील, प्रा. पल्लवी होगाडे, प्रा. निकिता करांडे उपस्थित होत्या. आभार डॉ. रिता रॉड्रिक्स यांनी मानले.

Scanned with CamScanner

सकाळ गुरुवार, १५ डिसेंबर २०२२



इचलकरंजी : विनायक खामकर यांची महाराष्ट्र शासनाच्या राज्यकर निरीक्षक पदावर नियुक्ती झाल्याबद्दल प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

## विनायक खामकर यांचा सत्कार

इचलकरंजी : डीकेएएससी कॉलेजचा माजी विद्यार्थी विनायक खामकर यांची महाराष्ट्र शासनाच्या राज्यकर निरीक्षक पदावर नियुक्ती झाली आहे. याबद्दल प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांच्या हस्ते सत्कार झाला. कॉलेजच्या गणित विभागाचा तो माजी विद्यार्थी आहे. खामकर याने गुणवत्तेच्या बळावर प्री. आय. ए. एस. ट्रेनिंग सेंटर, कोल्हापूर येथे प्रवेश मिळवून प्रशिक्षण पूर्ण केले. तो यूपीएससीची तयारी करत आहे. त्याला गणित विभागातील प्रा. डी. जे. मुंगारे, डॉ. एस. टी. सुतार, प्रा. हत्तरगी यांचे मार्गदर्शन लाभले.

CS Scanned with CamScanner

सकाळ

गुरुवार,
१५ डिसेंबर २०२२

# कदम महाविद्यालयात कार्यशाळा

इचलकरंजी : येथील दत्ताजीराव कदम आर्टस्, सायन्स व कॉमर्स महाविद्यालयात बँकिंग क्षेत्रातील करिअर संधी या विषयावर कार्यशाळा झाली. प्रमुख पाहुणे स्वप्नील तांबे म्हणाले, 'नोकरीतील सुरक्षितता, चांगला पगार, बढती, नोकऱ्यांच्या संधी, समाजामध्ये आदराचे स्थान तसेच समाजाप्रती उत्तरदायित्वाची भावना यामुळे पदवीधर बँकिंग व विमा क्षेत्राकडे वळत आहेत. आयबीपीएस, विमा, रेल्वे व पदवी स्तरावरील संयुक्त परीक्षांकडे अधिक आकर्षित होत आहेत.' अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. अनिल पाटील होते. स्वागत, प्रास्ताविक व पाहुण्यांची ओळख विभाग प्रमुख प्रा. विजय पाटील यांनी केली. आभार प्रा. डॉ. रिता रॉड्रिक्स यांनी मानले. कार्यशाळेत कॉमर्स विभागातील प्रा. मृणाली पाटील, प्रा. पल्लवी होगाडे, प्रा. निकिता करांडे आदी उपस्थित होत्या.

CS Scanned with CamScanner